तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२

ग्रह - EDUTECH E-mail :- desk12@dte.org.in Internet :- http://www.dte.org.in

तात्काळ

क्रमांक १२/आस्था/बदली/२०१२/३३०५

दिनांक : 16 AUG 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती व नागपूर.

विषय : सन २०१२ मध्ये विनंती / प्रशासकीय बदली केलेल्या कर्मचाऱ्यांच्या एकत्रित अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०१२ मध्ये आपल्या विभागातील गट "क" मधील कर्मचाऱ्यांच्या विभागांतर्गत विनंती / प्रशासकीय तसेच विभागीय विनंती बदलीबाबतचे या संचालनालयामार्फत वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. सदर बदल्या कार्यान्वीत करण्यासाठी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करुन एकत्रित अनुपालन अहवाल त्वरीत या संचालनालयास सादर करण्याबाबत आदेशात नमूद करण्यांत आलेले होते. परंतु असा एकत्रित अहवाल अद्याप या संचालनालयास पाठविण्यांत आलेला नाही. तसेच संचालनालयास प्राप्त झालेल्या अहवालानुसार बऱ्याच कर्मचाऱ्यांना अद्याप बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त केलेले दिसून येत नाही.

तरी या पत्राद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, सन २०१२ मध्ये गट "क" मधील कर्मचाऱ्यांच्या करण्यांत आलेल्या विनंती / प्रशासकीय बदल्या कार्यान्वीत करण्यासाठी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल खाली नमूद केलेल्या प्रपत्रांत नमूद करुन तात्काळ या संचालनालयास सादर करावा व ज्या कर्मचाऱ्यांना अद्याप बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यांत आलेले नाही त्या कर्मचाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी. अन्यथा कार्यालयप्रमुखांना यासाठी जबाबदार धरुन कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत का कार्यमुक्त करण्यांत आले नाही याबाबतच्या खुलाशासह अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम कार्यरत ठिकाण	बदलीने पदस्थापित केलेले ठिकाण / संस्था	कार्यमुक्त केल्याचा दिनांक	बदलीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक	कार्यमुक्त केलेले मसल्यास त्याबाबतची कारणे व पत्रव्यवहाराचा संदर्भ	कार्यमुक्त न करण्याबाबत विशिष्टपणे निर्देश दिले असल्यास संबंधीताचे नांव, पदनाम व संदर्भ	शेरा
१	२	३	४	५	६	७	८

आस्था/८

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

या.क.विकासी/आस्था-३/२०१२/५०५८
दिनांक :- 22 AUG 2012

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद,जालना,अंबड,जिंतूर, बीड, हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद ,पु.ला.लातूर,
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन,लातूर, उपसचिव, म.रा.तं.मं.प्रा.कार्यालय, औरंगाबाद

संचालनालयाच्या वरील संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे सन २०१२ मध्ये विनंती/प्रशासकीय बदली केलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबतची कार्यवाही करुन त्याबाबतचा एकत्रित अनुपालन अहवाल प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहिती व या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी